# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २१.०६.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २०.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २४ केसेसमध्ये २७ ईसमांवर कारवाई करून ३३,७६१२३/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ९,६१५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६५५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,७६,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २१.०६.२०२६ चे ०४.१० वा. ते ०६.४५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवितांना पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, तांडापेठ, लाल दरवाजा व रेल्वे क्रॉसिंगजवळील, आकाश पान शॉपसमोर रोडवर एका ॲक्टिवा मोपेडसह दोन संशयीत ईसम आढळुन आल्याने, त्यांना थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे १) शेख इकराम शेख मुजफ्फर वय २७ वर्षे रा. बाबा ताज मस्जिद जवळ, पंडीताईन चौक, खरबी, वाठोडा, नागपूर २) प्रविण उर्फ टेम्प्या गणेश निमवले वय ३१ वर्षे रा. तांडापेठ, लाडपुरा, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. संशयीतांजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण २० ग्रॅम एम.डी. पावडर किंमती अंदाजे २,००,०००/— रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल, मोपेड गाडी असा एकुण ३,००,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्याचा साथिदार पाहिजे आरोपी सोहेल उर्फ गोलु वल्द आरीफ खान रा. मानेवाडा, नागपुर याचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली

येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. गजानन गुल्हाणे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— डोडा पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २०.०६.२०२६ चे १६.४० वा. ते १७.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवितांना पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, प्लॉट क्र. १५२, शितलामाता हार्डवेअरजवळ, कपीलनगर येथे एका दुचाकी वाहनावरील एका संशयीत इसमास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव परमजीतसिंग हरबंससिंग सासन वय ५८ वर्षे रा. दीपक नगर, प्लॉट क्र. १५२, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यात प्लास्टीक पिशवीत एकुण ४४६ ग्रॅम डोडा पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन डोडा पावडर, ०१ मोबाईल, दुचाकी गाडी असा एकुण ७६,९९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथिदार पाहिजे आरोपी कालिया नावाचा इसम वय ४० वर्ष रा. टिपू सुलतान चौक, नागपूर याचेकडून आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता डोडा पावडर बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),१५(अ),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस

मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत क—हाडे, पोउपनि राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा युवानंद कडू, नारायण पारवेकर, पोअं. विरेंद्र पांडे, निलेश श्रीपात्रे, लक्ष्मीकांत सोनटक्के, मपोअं शशिकला नाईक यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी:— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०६.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, रामनगर कॅनल रोड, सोनी सेंटर जवळ एक इसम हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसल्याने, त्यास घेराव टाकून ताब्यात घेवुन, निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव कुणाल राकेश चौधरी वय २१ वर्षे रा. मुन्ना किराणा स्टोअर्स जवळ, हजारीपहाड, गिट्टीखदान, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं प्रविण लोखंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. रामेश्वर जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०६.२०२६ चे ०१.३० वा. ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट नं. १०१, गंगवानी गार्डन सोसायटी, आर्चिड अपार्टमेंट, भिलगाव, नागपुर येथे राहणारे फिर्यादी दिनेश मोहनलाल गुप्ता वय ४१ वर्षे हे आपले राहते घरी बेडरुममध्ये व वडील हॉलमध्ये झोपलेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे दुसरे बेडरुमच

े खिडकीची ग्रिल तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील कपाटामधील रोख १,१८,०००/— रुपये व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,५८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि विलास पाटील ८६९१९१९६६६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०५०२३ १/१९९७ | कलम ३८१, ३४ भा.दं.वि. | १)शिवनाथ डोमाजी नानवटकर रा. नंदनवन झोपडपट्टी, धुर्वेचे घराजवळ, नंदनवन नागपुर<br>२)संजयकुमार विशंभर दासवंजारे रा. मिनीमाता नगर, कळमणा, नागपुर<br>३) किसनलाल मिठ्ठु गोंड रा. डिप्टी सिग्नल, कळमणा, नागपूर<br>४) धनराज संतोष उईके रा. रेल्वे क्रॉसिंगजवळ, पारडी, कळमणा, नागपूर | २२.०१.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**